प्रकरण - २.

## उदारमतवाद

### १) प्रस्तावना -

राजकिय विचारप्रणालीतील एक महत्वाची विचारप्रणाली म्हणजे उदारमतवाद होय. उदारमतवादाचा उदय व विकास पुर्णपणे इंग्लंडमध्ये झालेला आहे. उदारमतवाद एक अंदोलन जीवनाची एक धारणा आहे. व्यक्ती स्वातंत्र्य व व्यक्तीचा विकास यांचे समर्थन करून जुन्या रुढी - परंपरेला विरोध करते. उदारमतवाद या विचारप्रणालीमध्ये हॉबहाऊस या विचारवंताची भुमिका महत्वाची आहे. त्यांनी आपल्या Liberalism या ग्रंथामध्ये असे मत मांडले आहे. की, व्यक्ती एक यंत्र नसून तो एक सजीव आत्मा आहे. एका सजीव व्यक्तीला आपल्या विकासासाठी स्वातंत्र्याचे वातावरण अवश्यक आहे. तसेच के. एम. पन्नीकर यांनी असे मत मांडले की, उदारमतवादात व्यक्तीच्या व्यक्तीमत्वादाचा विकास, भाषा-स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य राजकारणापासून धर्माचे वेगळे अस्तित्व, राजकिय, आणि सामाजिक प्रश्नाबाबत धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन यासारख्या बाबी महत्वाच्या मांडण्यात आल्या. तसेच व्यक्तीवर आर्थिक राजकिय सामाजिक स्वरूपाचे बंधन असू नयेत. यावरही उदारमतवादाचा भर आहे.

### * उदारमतवादाचा अर्थ आणि व्याख्या -

**• अर्थ -**

उदारमतवादी विचारप्रणाली व्यक्ती, स्वातंत्र्य, व्यक्तीविकास लोकशाही मुल्यावरती आधारित आहे. या विचारप्रणालीच्या संदर्भात

DATE

कोणत्याही एका कालखंडाच्या उल्लेख करता येत नाही कालानुसार त्यामध्ये उत्क्रांती झालेली दिसून येते. उदारमतवादाच्या संदर्भात अनेकांनी आपापल्या परिने विचार मांडला असला तरी या त्यांच्या विचारामध्ये एकता दिसून येत नाही उदारमतवादाच्या अर्थ मध्ये ही भिन्नता आहे साधारणत: ज्या विचारवंतांनी उदारमत्वादाच्या परिपूर्ण असा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांचा विचार पुढीलप्रमाणे व्याख्येच्या स्वरूपात सांगता येईल.

- **व्याख्या –**

1) **लास्की –** "उदारमतवादाचा सरळ संबंध स्वातंत्र्याशी आहे. यामध्ये काही शंका नाही"

2) **मॅक गव्हरनर –** "उदारमतवादाचा अर्थ म्हणजे एका राजकिय सिध्दांन्ताच्या स्वरूपामध्ये लोकशाही व व्यक्तीवाद या दोन वेगवेगळ्या तत्वाचे मिश्रण आहे.

3) **सारटोरी –** "उदारमतवाद व्यक्ती स्वातंत्र्य न्यायालयीन संरक्षण संविधानीक राज्याचा सिध्दान्त आहे. आज उदारमत्वादास व्यक्तीवर लोकशाही व समाजवादाच्या मिश्रणाच्या स्वरूपामध्ये विकसीत एका भांडवलशाही वर्गाची विचारप्रणाली म्हणटली जाते.

- **उदारमतवाद शब्दाची उत्पत्ती –** उदारमतवादास इंग्रजीमध्ये Liberalism असे म्हणतात. Liberalism हा शब्द 'लॅटिन' भाषेतील Liber (लिबर) पासुन तयार झाला. Liber या शब्दाचा अर्थ स्वातंत्र्य असा होतो. जो व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करतो. किंवा ज्या सिध्दान्तामध्ये, विचारामध्ये

Scanned with CamScanner

दृष्टिकोनामध्ये स्वातंत्र्याचे समर्थन करण्यात आले आहे. त्यास Liberal हे विशेषण जोडले आहे. Liberal चा अर्थ सुसंस्कृत व शालिन असाही होतो. Liberal या शब्दाचा शब्दप्रयोग सर्वप्रथम 19 व्या शतकामध्ये आलेला आहे.

अशा प्रकारे काही विचारवंतांनी उदारमतवादाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, शांतता सहकार्य इत्यादी लोकशाही मूल्यांनी युक्त असलेला विचार प्रवाह म्हणजे उदारमतवाद होय.

## * उदारमतवादाचा विकास -

उदारमतवादाचा उदय आणि विकास इंग्लंडमध्ये झालेला आहे. इंग्लंडमध्ये अनुदारवादाला विरोध करण्यातून योना । याचा उदय झालेला आहे. परंतु उदारमतवादाचे बिजे प्राचिन कालखंडामध्ये (कालामध्ये) दिसून येतात. सुफिस्ट विचारवंतांनी सॉक्रेटिसनी स्वातंत्र्याचे समर्थन केले होते. त्यावरून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पध्दतीनी विचार केल्यास तेथूनच उदारमतवादाची सुरुवात झाली आहे. असे आपणास म्हणता येईल.

जॉन लॉक हा उदारमतवादाचा जनक मानला जातो. त्यांनी स्वातंत्र्य, समानता व संपत्ती या नैसर्गीक अधिकाराचे समर्थन केले. उदारमतवादाच्या विकासामध्ये 'मॉर्टिन ल्युथर' हॉलटेमर, ॲडम स्मिथ, मॉंटेस्क्यु, कांट, गेटेल, जेफरसन, थॉमस पेन, टी. एच. ग्रीन, जॉन ड्युअर्स, मिल, डेकार्त, स्पिनोझा इत्यादी पाश्चात्य विचारवंतांचे तसेच रानडे, गोखले, नौरोजी, बॅनर्जी इ. भारतीय विचारवंतांचे उदारमतवादाच्या विकासात योगदान आहे.

उदारमतवादाच्या विकासाचा उल्लेख करताना. इंग्लंड मधील रक्तविहीन क्रांती, अमेरीकन क्रांती, फ्रेंच क्रांती, औद्योगिक

क्रांती इ. चाही उल्लेख करावा लागेल कारण त्या स्वातंत्र्यासाठीच म्हणजेच उदारमतवादासाठीच झाले आहे. उदारमतवादाचा विकास इंग्लंडप्रमाणेच अमेरीका, फ्रान्स, जर्मनी, भारत इत्यादी देशामध्ये झालेला ही दिसून येतो.

* उदारमतवादाची तत्वे / वैशिष्टे -

1) प्रस्तावना
2) [redacted] अर्थ
3) उदय आणि विकास
4) वैशिष्टे.

1) व्यक्ती स्वातंत्र्य -

व्यक्तीस्वातंत्र्य हे उदारमतवादाचे सर्वात महत्वाचे वैशिष्टे आहे. व्यक्तीला सामाजिक, आर्थिक, राजकिय, संस्कृती इत्यादी सर्व बाबी मध्ये स्वातंत्र्य असले पाहिजे. स्वातंत्र्या शिवाय व्यक्तीचा समाजाचा व राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. व्यक्तीवर कोणत्याही निरंकुश सत्याचे नियंत्रण असू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छे नुसार वागण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. प्रत्येक मनुष्याला जन्मत: काही स्वातंत्र्य मिळतात. स्वातंत्र्य हा त्याचा नैसर्गिक व जन्मसिद्ध अधिकार आहे. रूसोनी मांडल्या प्रमाणे मनुष्य हा जन्मत: स्वातंत्र्य असतो. परंतु तो अनेक बंधनाने जखडला जात असतो. यावरून आपणास असे म्हणता येईल : की उदारमतवादी विचार प्रणाली पुर्णपणे व्यक्तीस्वातंत्र्यावर आधारलेली आहे.

2) बुध्दीवादावर विश्वास -

उदारमतवाद विवेकावर विश्वास आहे. भावनेवर बुध्दीचा अधिकार असला पाहिजे असे उदारमतवादाचे मत आहे. कोणताही निर्णय विवेक बुध्दीवर आधारित घेतला जाईल. चर्चा, वादविवाद करून विचारांची देवाणघेवाण करून तो निर्णय घेतला जाईल. थॉमस पेन (Thomus Pen) यांनी रूढीवादाला विरोध करून असे म्हणटले की, " माझे मनच माझे चर्च आहे. अशाप्रकारे उदारमतवाद्यांनी विवेकावर विश्वास ठेवून व्यक्ती स्वातंत्र्याला प्रोत्साहित केले आहे.

3) रूढी, परंपरेला विरोध -

उदारमतवाद्यांनी, बुध्दीवादयांचे समर्थन करून रूढी, परंपरेला विरोध केलेला आहे. एखादा विचार, एखादा सिध्दांत बुध्दीवर / विवेकावर आधारित नसेल तर त्याला विरोध केला पाहिजे. व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी व विकासासाठी वाईट रूढी, परंपरेला अंधश्रध्देला विरोध करणे आवश्यक असते. इंग्लंडमध्ये या तत्वांच्या आधारावर फार मोठ्या प्रमाणामध्ये परिवर्तन झालेले आहे.

4) व्यक्ती साध्य, राज्य साधन -

उदारमतवादाचे मते व्यक्ती साध्य व राज्य साधन आहे. व्यक्तीचा विकास, कल्याण, शांतता, सहयोग इत्यादीवर उदारमतवादाचा भर आहे. व्यक्तीचे हे साध्य, साध्य करण्यासाठी राज्यांनी, समाजांनी प्रयत्न करावा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी कायद्याची निर्मिती करावी असे उदारमतवाद्यांचे मत आहे.

थोडक्यात उदारमतवाद्यांनी राज्यापेक्षा व्यक्तीला महत्त्व दिले आहे.

5) राज्य ही कृत्रिम संस्था आहे -

उदारमतवाद्यांच्या मते राज्य ही कृत्रिम संस्था आहे. मानवाने राज्याची निर्मिती केलेली आहे. राज्य ही नैसर्गिक संस्था नसून ती मानवनिर्मित संस्था आहे. व्यक्तींनी आपल्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याची निर्मिती केलेली आहे. यावरून राज्य ही नैसर्गिक संस्था नसून ही कृत्रिम संस्था आहे. असे उदारमतवाद्यांचे मत आहे.

6) नैसर्गिक अधिकारावर विश्वास -

उदारमतवाद्यांच्या मते व्यक्तीला जे नैसर्गिक अधिकार प्राप्त झाले आहेत त्यावर राज्यांनी बंधणे टाकू नयेत. व्यक्तीला जे अधिकार जन्मतः प्राप्त होतात त्या अधिकारांचा समावेश नैसर्गिक अधिकारामध्ये होतो. जॉन लॉक (John Lock) या ब्रिटिश विचारवंतानी जीवन जगण्याचा अधिकार स्वातंत्र्याचा अधिकार आणि मालमत्तेचा अधिकार या तिघांचा समावेश नैसर्गिक अधिकारामध्ये केला आहे. राज्याने नैसर्गिक अधिकाराचे संरक्षण केले पाहिजे. या अधिकारांचे उल्लंघन करता येत नाही. डलिंग (Daling) च्या मते नैसर्गिक अधिकाराची कल्पना ही लॉक ने राज्यशास्त्रामध्ये घातलेली मोलाची भर आहे. असे मत व्यक्त केले आहे.

## ७) कायद्याच्या शासनाचे समर्थन -

उदारमतवाद्यांनी कायद्याच्या शासनाचे समर्थन केलेले आहे. एका व्यक्तीच्या शासनाला ते विरोध करतात. शासक व शासित या दोघांनीही कायद्याचे पालन केले पाहिजे सर्वासाठी समान स्वरूपाचा कायदा असेल. कायद्याचा उल्लंघन करणाऱ्याला शिक्षा दिली जाईल. तसेच कायदा जर व्यक्ती अधिकाराच्या विरोध. स्वातंत्र्याच्या विरोध असेल तर त्याला विरोध करण्याचा अधिकारही जनतेला आहे. यामुळेच उदारमतवाद्यांनी कायद्याच्या शासनाचे समर्थन केले आहे.

## ८) धर्मनिरपेक्ष राज्याचे समर्थन -

उदारमतवादयांनी धर्माधिष्ठीत राज्याला विरोध करून धर्मनिरपेक्ष राज्याचा स्विकार केला. राज्याच्या समोर सर्वधर्म समान असतील. राज्याद्वारे धर्माच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. परंतु धर्म ही खाजगी बाब असल्यामुळे सर्व नागरिकांना धार्मिक बाबतीमध्ये स्वातंत्र्य देण्यात आले आहे. आपआपल्या धर्मानुसार पुजा विधी करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकांना आहे. तसेच स्वइच्छेनुसार कोणताही धर्म स्विकारण्याचा किंवा त्याग करण्याचा अधिकारही आहे. जॉन लॉक हा धार्मिक सहिष्णुतेचा कट्टर समर्थक होता. थोडक्यात उदारमतवादी विचारवंतांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांचा अंगीकार केलेला आहे.

## ९) लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार -

उदारमतवादयांनी लोकशाही शासनाचा स्विकार केलेला आहे. इतर शासनाच्या तुलनेमध्ये लोकशाही शासनव्यवस्थेला ते उत्कृष्ट मानतात. कारण यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शांतता इत्यादी तत्वांचा अंगिकार केला जातो. रक्तपाताशिवाय बदल होतो. अहिंसेच्या, नैतिकतेच्या शांततेच्या मार्गाचा अवलंब केला जातो. सत्ता ही एकाच्याच हाथामध्ये न राहता ती जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या हाथी असते इ. कारणामुळे उदारमतवादयांनी लोकशाही शासन व्यवस्थेचे समर्थन केले आहे.

## १०) विश्वशांती व विश्वबंधुत्वाचा स्विकार -

उदारमतवाद या राजकिय विचारप्रणालीने आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये विश्वशांती व विश्व बंधुत्वाचे समर्थन केले आहे. विश्वशांतीशिवाय कोणत्याही राष्ट्रांनी शांततेच्या मार्गाचा अवलंब करावा. मैत्रीचे संबंध निर्माण करावे. इतर देशामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. आंतरराष्ट्रीय नैतिकता व आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करावे असे उदारमतवादयांचे मत आहे.

अशाप्रकारे वरिलप्रमाणे उदारमतवादाची वैशिष्टे सांगता येतील.

## * उदारमतवादाचे प्रकार

उदारमतवादाचे या विचारप्रणालीचे दोन प्रकार पडतात.

1) पारंपारिक उदारमतवाद

2) आधुनिक उदारमतवाद

कालानुसार व परिस्थितीनुसार उदारमतवादामध्ये जो बदल झाला आहे. त्या बदलावरून हे प्रकार दिसून येतात.

1] पारंपारिक उदारमतवाद — (Traditional Liberalism) पारंपारिक उदारमतवादास नकारात्मक, जुना किंवा प्राचिन उदारमतवाद असेही म्हणतात. या उदारमतवादाच्या विकासामध्ये जॉन लॉक (John Lock) यांचे विशेष योगदान आहे. आणि लॉकने व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन केलेले आहे आणि हॉब हाऊस (HoB House) यांनी आपल्या "Liberalism" या ग्रंथामध्ये पारंपारिक उदारमतवादाची नऊ तत्वे सांगितलेली आहेत. ते खालीलप्रमाणे

i) नागरी स्वातंत्र्य
ii) संपत्तीचे स्वातंत्र्य
iii) व्यक्तीगत स्वातंत्र्य
iv) सामाजिक स्वातंत्र्य
v) आर्थिक स्वातंत्र्य
vi) कौटुंबिक स्वातंत्र्य
vii) राष्ट्रीय स्वातंत्र्य
viii) आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य
ix) राजकिय स्वातंत्र्य

Scanned with CamScanner

## * पारंपारिक उदारमतवादाची वैशिष्टे -

1) **व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन -**

पारंपारिक उदार मतवादाचा विचार करताना जॉन लॉक यांनी व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन केलेले आहे. जॉन लॉक यांनी व्यक्तीच्या स्वातंत्र्य (Liberty) वरती जास्त भर दिलेला आहे.

2) **अहस्तक्षेपाचे धोरण -**

पारंपारिक उदारमतवादा- मध्ये जॉन लॉक यांनी अहस्तक्षेपाच्या धोरणाला महत्त्व दिलेले आहे. आर्थिक आणि अन्य व्यक्तीच्या कार्यामध्ये इतराचा कसल्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेतली.

3) **राज्याचे सिमित कार्यक्षेत्र -**

पारंपारिक उदारमत- वादामध्ये जॉन लॉक यांनी राज्याचे राज्यक्षेत्र। कार्यक्षेत्र सिमित असावे ~~म्हणजे~~ असे महत्त्व पा. उदारमतवादामध्ये देण्यात आले आहे.

4) **अनियंत्रित अर्थव्यवस्था -**

पारंपारिक उदारमतवादा- मध्ये जॉन लॉक यांनी अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे अनियंत्रित व बाजारी अर्थव्यवस्थे प्रमाणे ठेवण्यास महत्त्व दिले आहे. म्हणजेच अर्थव्य- वस्थेमध्ये विनिमय इतर नफा इ. गोष्टीवरती दुर्लक्ष केलेले आहे.

Scanned with CamScanner

5) **लोकशाहीचे समर्थन** - पारंपारिक उदारमतवादामध्ये लोकशाहीचे समर्थन केले आहे. म्हणजेच राज्याची अंतीम सत्ता लोकांच्या हाथामध्ये देण्यात आली आहे.

6) **नैतिकतेला महत्व** - पारंपारिक उदारमतवादामध्ये नैतिकतेला अत्याधिक महत्व जॉन लॉक यांनी दिलेले आहे.

7) **क्रांतीला महत्व** - पारंपारिक उदारमतवादामध्ये क्रांतीला महत्व देण्यात आला आहे. क्रांतीचा हा अंतीम उपाय असेल याचे समर्थन जॉन लॉक नी केले आहे.

अशा प्रकारे Hob House (हॉब हाऊस) यांनी व्यक्ती स्वातंत्र्यासाठी असणारे महत्वाचे तत्वे आणि जॉन लॉक यांनी पारंपारिक उदारमतवादामध्ये वरील विविध घटकांचे समर्थन करून व्यक्ती-स्वातंत्र्याला चालना दिली आहे.

2] **आधुनिक उदारमतवाद (modern Liberalism)** -

आधुनिक उदारमतवादास सकारात्मक किंवा नव उदारमतवाद असे ही म्हणतात. 19 व्या शतकाच्या शेवटी किंवा 20 व्या शतकाच्या सुरूवातीमध्ये काळानुसार परिस्थितीनुसार उदारमतवादी विचारसरणीमध्ये बदल करून नवीन विचारांचा

स्वीकार केलेला आहे. इंग्लंडप्रमाणे इतर अनेक देशामध्ये आधुनिक उदारमतवादाचा अंगीकार करण्यात आलेला आहे. आधुनिक उदारमतवादाच्या विचारामध्ये T.H. Green (टि.एच. ग्रीन) यांची भूमिका महत्वाची आहे. या उदारमतवादाची वैशिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## * आधुनिक उदारमतवादाची वैशिष्टे –

### 1) स्वातंत्र्य व समतेवर विश्वास –

पारंपारिक उदारमतवादात केवळ स्वातंत्र्यावरती भर देण्यात आलेला होता. आधुनिक उदारमतवादामध्ये स्वातंत्र्याबरोबरच समतेच्या तत्वाचाही अंगीकार करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्याशिवाय समतेचा किंवा समतेशिवाय स्वातंत्र्याचा विचार करता येत नाही. जात, धर्म, वंश, लिंग इ. कोणत्याही तत्वाच्या आधारावर राज्याने कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी दयावी. असे आधुनिक उदारमतवादयांचे मत आहे.

### 2) हस्तक्षेपाचे धोरण –

आधुनिक उदारमतवादयांनी हस्तक्षेपाच्या धोरणाचे समर्थन केले आहे. व्यक्तीच्या विकासासाठी सामाजिक, राजकिय, आर्थिक इत्यादी क्षेत्रामध्ये काही प्रमाणात राज्याने हस्तक्षेप करावे. त्यातल्यात्यात आधुनिक उदारमतवादयांनी आर्थिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेपाच्या धोरणाचे समर्थन केले आहे. शिक्षण व्यवस्था, मद्य निषेध, स्त्रीयावरील अन्याय दूर करण्यासाठी, गरीबी, बेकारी

Scanned with CamScanner

दूर करण्यासाठी राज्याने हस्तक्षेप करावा असे आधुनिक उदारमतवाद्यांचे मत आहे.

3) राज्याच्या कार्यक्षेत्रामध्ये वाढ –

आधुनिक उदारमतवाद्यांनी हस्तक्षेपाच्या धोरणाचे समर्थन केले असल्यामुळे राज्याच्या कार्यक्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे. याचे समर्थन आधुनिक उदारमतवाद्यांनी केले आहे. पारंपारिक उदारमतवाद्यांनी राज्याच्या कार्यक्षेत्रावर मर्यादा टाकली होती. परंतु टी. एच. ग्रीन (T.H. green) पासून राज्याला आर्थिक बाबतीमध्ये अधिकार देण्यात आल्याने त्याचे कार्यक्षेत्र हे व्यापक बनले आहे.

4) कल्याणकारी राज्याचा स्विकार –

20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून आधुनिक उदारमतवाद्यांनी कल्याणकारी राज्याचा स्विकार केला आहे. राज्याचे कार्य केवळ शांतता व सुरक्षितता निर्माण करणे एवढेच मर्यादित नसून आर्थिक हित संबंधाची जोपासना केली आहे. लास्कीने या संदर्भात असे म्हणटले आहे की," राज्य जीवनासाठी अस्तित्वात आलेले असून चांगल्या जीवनासाठी त्याचे अस्तित्व कायम राखले गेले आहे." कल्याणकारी राज्यामध्ये शिक्षण, अन्न, वस्त्र, निवारा व इतर अनेक घटकांचा समावेश त्यामध्ये होतो.

5) औपचारिक व तात्विक स्वातंत्र्याचा स्विकार –

औपचारिक स्वातंत्र्याबरोबर तात्विक स्वातंत्र्याचा

स्विकार करण्यात आला आहे. औपचारिक स्वातंत्र्यामध्ये राज्याचा हस्तक्षेप व्यक्तीच्या त्या कार्यामध्ये होत नाही. त्या कार्याचा समावेश यामध्ये होतो.

उदा. भाषेचे स्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य इत्यादी
तात्विक स्वातंत्र्य व्यक्तीच्या आत्मविकासास साह्य करते.

उदा - शिक्षण, आरोग्य काम करणे इत्यादी.

## ६) नियंत्रीत अर्थव्यवस्थेचा स्विकार -

आधुनिक उदारमतवादात मिश्रीत व नियंत्रीत व्यवस्थेचा स्विकार केला आहे. अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व नियोजन राज्याद्वारे झाले पाहिजे. तरच त्या देशाचा विकास होईल. बाजारी अर्थव्यवस्थेमुळे विकास होवू शकणार नाही असे त्यांचे मत आहे.

## ७) सुधारणा व शांतता याद्वारे सामाजिक परिवर्तन -

आधुनिक उदारमतवाद्यांनी सुधारणा शांतता, याद्वारे सामाजिक व राजकिय परिवर्तण होईल. यावर विश्वास होता. सामाजिक परिवर्तनाचे कार्य राज्याद्वारे केले जाईल. असे त्यांचे मत होते. सरकारमध्ये बदल करण्याचा अधिकार लोकांना असेल असे आधुनिक उदारमतवादयांचे मत आहे.

## ८) भौतिक सुखांना प्राधान्य -

आधुनिक उदारमतवाद्यांनी केवळ नैतिकतेवर भर दिला नाही. त्याचबरोबर भौतिक सुखांना ही प्राधान्य दिले.

Scanned with CamScanner

परंतु भौतिक सुखाची प्राप्ती करण्यासाठी त्यांनी अनैतिकतेच्या मार्गाचा विरोध केला आहे. भौतिक सुख नैतिक सुखाच्या पुरक आहे. असे त्यांचे मत आहे. अशा प्रकारे आधुनिक उदारमतवाद्यांनी पारंपारिक उदारमतवाद्याच्या तत्वामध्ये बदल करून नवीन तत्वाचा अंगिकार केला आहे.

9> इतर घटक -

वरील विविध घटकांच्या आधारा वरतीच हे ही घटक आधुनिक उदारमतवाद्यांनी व्यक्तीच्या हिता करीता मांडले आहेत ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

i) व्यक्ती साध्य राज्य साधन

ii> लोकशाहीचा स्विकार.

iii> शांततेच्या मार्गाने परिवर्तन.

अशा प्रकारे वरील प्रमाणे टी.एच ग्रीन (T.H. green) यांनी आधुनिक उदारमतवाद्याच्या अनुषंगाने विचार मांडलेले आहेत.

Scanned with CamScanner

* उदारमतवादाचे दोष / टिका / उणीवा -

उदारमतवादाचा पुढील प्रमाणे विचार करण्यात आला असला तरी तरी त्यामध्ये अनेक दोष आहेत. ते पुढीलप्रमाणे

i) हस्तक्षेप करणे चुकीचे -

पारंपारिक उदारमतवाद हस्तक्षेपाच्या धोरणाचे समर्थन करतो. परंतु त्यामध्ये गोरगरीब व्यक्तीच्या शिक्षणाची आरोग्याची मोठ गैरसोय होते. राज्याच्या हस्तक्षेपाच्या अभाव असेल तर समाजामध्ये शक्तिशाली लोकांचे वर्चस्व निर्माण होते. असे टिकाकारांचे मत आहे.

ii) केवळ स्वातंत्र्यावर भर देणे अयोग्य -

केवळ स्वातंत्र्यावर भर देणे चुकीचे आहे. व्यक्तीला प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वातंत्र्य देण्यात यावे असे उदारमतवाद्यांचे मत आहे. परंतु ते अयोग्य आहे. कारण प्रत्येक व्यक्तीची बौध्दीक क्षमता, निर्णय घेण्याची क्षमता सारखी राहत नाही. प्रत्येकजन सदैव चांगल्याच प्रकारचा निर्णय घेवू शकत नाही असे टिकाकारांचे मत आहे.

iii) रूढी, परंपरेला विरोध करणे चुकिचे -

उदारमतवादाने रूढी, परंपरा इतिहास याला विरोध केला आहे. ते ही चुकीचे आहे. असे एडमंड बर्कचे मत आहे. कारण इतिहासाकडे उदारमतवाद्यांनी डोळे झाकलेली आहे. ती तसेच रूढी परंपरेलाही विरोध केलेला आहे. इंग्लंडसारख्या देशाच्या

Scanned with CamScanner

विचार करतात रूढी, परंपरेला विरोध करणे हे आयोग्य आहे. असे टिकाकारांचे मत आहे.

iv) कार्लमार्क्सनी केलेली टिका -

उदारमतवादावर टिका करताना मार्क्सवादी असे म्हणतात की, उदारमतवाद भांडवलशाही वर्गाच्या हितासाठी पोषक आहे. भांडवलशाहीचे दुसरे नाव म्हणजे उदारमतवादच होय.

v) बुध्दी व विवेकाला शक्यतेपेक्षा जास्त महत्व -

उदारमतवाद बुध्दी आणि विवेकाला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्व देण्यात आलेला आहे. तर टिकाकारांच्या मते ही महत्व चुकीचे आहे.

vi) एडमंड बर्कनी केलेली टिका -

एडमंड बर्क यांनी लोकच्या नैसर्गिक अधिकारावरही टिका केली आहे. या अधिकाराला राज्यांनी संपूर्ण मान्यता देवू नये. यातूनही अराजकता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे एडमंड बर्कचे मत आहे.

vii) सामाजिक हिताला अडथळा -

सांस्कृतिक क्षेत्रामध्ये नकारात्मक उदारमतवाद नैतिकता व अनैतिकता यामध्ये फरक करत नाही. त्यामुळे सामाजिक हिताला अडथळा निर्माण होतो. असे टिकाकारांचे मत आहे.

Scanned with CamScanner

वरीलप्रमाणे उदारमतवादावर टिका करण्यात आली असली तरी त्याच्या गुन्ह्या कडे दुर्लक्ष करून चालत नाही.

Scanned with CamScanner